International Journal of Advance and Applied Research (IJAAR)
Peer Reviewed Bi-Monthly
ISSN – 2347-7075
Impact Factor – 0.899
Vol.2 No.6 July – Aug. 2015

# समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून धनगर समाजाची सांस्कृतिक परंपरा, प्रथा व राजकीय स्थिती

**प्रा. शरद नामदेव बोरवडेकर**

*गोपाळ कृष्ण गोखले महाविदयालय, कोल्हापूर*

**प्रस्तावना:**

धनगर समाज हा १०८ कुळी मेंढपाळ एक हिंदू जो प्रामुख्याने शेती आणि पशुपालन व्यवसाय करतो असा समाज आहे. हे क्षत्रिय धनगर लोक  मध्यप्रदेश, महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश, अरुणाचल प्रदेश, आसाम, बिहार, मध्यप्रदेश, तेलंगणा राज्यांत राहतात. मल्हारराव होळकर, अहिल्यादेवी होळकर, सरदार यशवंतराव होळकर हे या समाजातील थोर ज्ञात व्यक्ती होते.

- या समाजाचे दैवत बिरोबा, बाळुमामा आहेत. सामाजिक परिस्थिती नुसार वेगवेगळ्या राज्यात समाजाला दिलेल्या सामाजिक व शैक्षणिक आरक्षणाचे प्रमाण वेगवेगळे आहे. महाराष्ट्रात धनगर समाज हा भटक्या जाती-क (एनटी-सी) या प्रवर्गात मोडतो.
- त्यांना सामाजिक व शैक्षणिक आरक्षण ३.५% इतके दिलेले आहे. शासनाने प्रसिद्ध केलेल्या अनुसूचित जमातीच्या सूचीच्या यादीमध्ये अनुक्रमांक ३६ (Sr.No.- 36) वर हि दिसणारी अनुसूचित जमाती आहे.
- धनगर म्हणून ओळखला जाणारा आणखी एक समुदाय आहे, ज्यांचा पारंपरिक व्यवसाय म्हणजे गुरे पाळणे आणि लोकरी विणणे.

धनगर मेंढपाळ असलेल्या धनगरांना महाराष्ट्र राज्यात भटक्या जमाती म्हणून अधिसूचित करण्यात आले आहे. धनगर समाज त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण चालीरीतीमध्ये लोकगीत, कथा, उत्सव, धार्मिक श्रद्धा यांचा समावेश होतो. धनगराचे देव-देवता, कुळाचार प्रथा-परंपरा अन्य समाजापेक्षा भिन्न आहेत. बिरोबा, सुराप्पा, मायाक्का हे धनगरांचे प्रमुख देव आहेत. मुगार, अंधारबोन, यात्रे भरणे, वातुक, हेडाम, ईर, गुगुळ, दुध शिजवणे अशा प्रकारच्या प्रथा हा समाज साजरा करतो. धनगराचे स्वतंत्र पुजारी असतात. धनगर समाजाची स्वतंत्र लोककला असून ती त्यांच्या जीवनशैलीतून निर्माण झालेली आहे.

सदर लेखात धनगर समाजातील सांस्कृतिक परंपरा, प्रथा व राजकीय स्थितीचा आढावा या दोन्ही गोष्टीचा समाजशास्त्रीय अभ्यास केलेला आहे.

**धनगर समाजातील संस्कृती:**

- धनगर समाजातील लोक हे हातात कुऱ्हाड, पाठीवर घोंगड, हातात कड, कोल्हापुरी चप्पल वापरतात. जय मल्हार.. यळकोट यळकोट जय मल्हार.., बिरोबाच्या नावानं चांगभलं... हे समाजाचे ब्रीदवाक्य आहे. धनगर समाजामधील देवळात भंडारा उधळला जातो. ही लोक धनगरी ओवी गातात व गजी नृत्य केले जाते.
- बापू बिरू वाटेगावकर, धनगरवाडा, ख्वाडा, बाळू मामांची गाथा या चित्रपटांतून आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, जय मल्हार, श्री संत बाळूमामा या नाट्यकलांत धनगर समाजाची संस्कृती दर्शवलेली आहे.

**धनगर समाजातील संस्कृती मधील मुद्दे :**

**१. धनगर समाजातील सण उत्सव:**

धनगर समाजात विविध उत्सव केले जातात. यामध्ये प्रामुख्याने कुलदेवताची जत्रा-उत्सव महत्वाचा असून धनगर समाजातील प्रत्येक व्यक्ती त्यात सहभागी होत असते. यामध्ये बिरोबा, खंडोबा, मायाक्का अशा विविध कुलदैवतांचे सण साजरे केले जातात. यावेळी बाबर जत्रा, देव ओवाळणी, हुईक नवस फेडणे. इत्यादी उत्सव धनगर लोक साजरी करतात. यामध्ये सण-उत्सवात बाबर यात्रा धनगर मुलामुलीची लग्न झालेल्या जोडप्यांसाठी असते. बाबर जत्राचा हा विधी केल्याशिवाय आणि चार-दोन पाहुण्यांना भोजन पाठवल्याशिवाय नवरा बायकोला वैवाहिक संबंध ठेवता येत नाहीत. तसेच देवाचे वारे हा स्त्रियांच्या अंगात येणारी प्रथा आहे. धनगर समाजात यात्रेच्या व्यतिरिक्त हिंदू धर्मातील सण देखील साजरे केले जातात. यामध्ये दसरा हा महत्वाचा सण धनगर समाज मोठ्या प्रमाणात साजरा करतो. शस्त्र पूजा करतो तसेच पोळा, दिवाळी, अक्षयतृतीया, नागपंचमाता, शिमगा हे सण मोठ्या भक्तीभावाने धनगर समाज करत असतो.

**२. धनगर समाजातील जत्रा-यात्रातील प्रथा परंपरा :**

धनगर समाजामध्ये विठ्ठल-बिरदेव, खंडोबा, धूळदेव या देवांच्या मोठ्या प्रमाणात यात्रा भरवल्या जातात. आपल्या रक्षणकर्ता देव असल्यामुळे शेळया-मेंढ्याचा बळी दिला जातो. आपले कुटुंब सुखी राहावे,

सुखवैभव लाभावे, शेळ्या मेंढ्यांना रोगराई होऊ नये यासाठी देवाला नवस बोलतात, भंडारा उधळून देवाचा जागर घातला जातो. ही प्रथा वर्षानुवर्षे चालत आलेली आहे. आजही धनगर बांधव जत्रा-यात्रा मोठ्या प्रमाणात भरवितात. या जत्रा यात्राच्या निमित्ताने अनेक धनगर स्त्री पुरुष गीत म्हणताना दिसतात. देवाविषयी श्रद्धा, भक्ती व्यक्त करताना प्रार्थना केली जाते. मंडळी पारंपरिक पद्धतीने या समाजाला अभिप्रेत असणारी गीते सादर करतात. धनगर समाजात पालखी आणणे किंवा देव बसविणे परंपरा असून देव घरी बसल्यानंतर दोन वेळेची पूजा, देवाच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांना पुरणपोळीचे जेवण व पालखीचा येण्या-जाण्याचा खर्च भक्ताला करावा लागतो. रात्रीच्या वेळी 'सुंबरान' हा धनगरी ओवीगीताचा कार्यक्रम केला जातो. यातून देवाच्या पराक्रमाच्या लीला गायल्या जातात."

मूल वाहणे ही प्रथा खंडोबा यात्रेत केली जाते. यावेळी मुल प्राप्तीसाठी नवस बोलले जाते आणि नवस पूर्ण झाल्यावर ते नवस फेडण्यासाठी मुले देवाला वाहले जाते. यामध्ये मुल हे मुलगा असेल तर त्याला 'वाघ्या' बनविले जाते. व मुलगी असेल तर तिला 'मुरळी' बनविले जात असून वाघ्या-मुरळी बनण्याची विधी केली जाते.

**३. लोककथा :**

धनगर समाजाच्या संस्कृतीत लोककथेला महत्वाचे स्थान आहे. लोककथेच्या माध्यमातून आपली परंपरा एका पिढीकडून दुसऱ्या पिढीकडे संक्रमित होत असते. धनगर समाज हा फिरत असल्याने मनोरंजनाची अपुरी साधने, शिक्षणाचे अत्यल्प प्रमाण, देवाविषयीची प्रचंड श्रद्धा यामुळे धनगरांच्यात अनेक लोककथा निर्माण झालेल्या आहेत. धनगरांच्या लोकदैवता संबंधीच्या कथांमध्ये सर्व प्रकारची वैशिष्ट्ये समाविष्ट असतात. एकाच वेळी एक लोककथा अद्भुत कथा असते, तर त्याचवेळी ती चरित्रकथा असते, विवाह कथा ही सांस्कृतिक कथा म्हणून समोर येतानाच ती पराक्रम कथासुद्धा असते. बिरोबा, खंडोबा, धुळोबा भैरवनाथ यांच्या कथा अवतार कथा म्हणून समोर येतानाच त्यात अद्भुतता, चमत्कार, पराक्रम आदि प्रकाराने संमिश्र दिसतात.

**४. लोकगीते :**

धनगर संस्कृतीत लोकगीतांद्वारे समाजातील प्रथा व परंपरा प्रतिबिंबीत होत असतात. यामध्ये पुरुष व स्त्री लोकगीते आढळून येतात, धनगर स्त्री लोकगीतातूर "धनगर स्त्री जीवनाचे वेगळेपण त्याच्या अनुभुती व अभिव्यक्तीस पहावयास मिळते. धनगर स्त्री जीवनाचे सामाजिक दर्शन आणि स्त्री समुह मनाच्या वैविध्यपुर्ण मनोवृती व भाववृती यांचा अढळ स्त्री गीतांतून व्यक्त होतो.

तसेच धनगर समाजात जात्यावरील ओव्यातून विविध लोकदैवतांचे विवेचन केले जाते. या गीतातून धनगर स्त्री ओवीगीताची सुरुवात करताना ब्रम्हा, विष्णू, शंकर या तीन देवांच्या नावाने सुरुवात करते. धनगर

समाजाच्या लोकगीतात पुरुषांची लोकगीते महत्वाची असून यात 'सुंबरान' नावाचा गीत प्रकार धनगरी ओव्या म्हणून अतिशय लोकप्रिय आहे. या ओव्या प्रामुख्याने यात्रा-जत्रा या वेळी म्हटल्या जातात.

**५. धनगरांची लोककला (धनगरी नृत्य) :**

'गोफ नृत्य' हा धनगरातील वैशिष्ट्यपूर्ण नृत्य प्रकार आहे. हा नृत्य प्रकार कोणत्याही विधीशी संबंधित नाही, परंतु तो अतिशय कुशलतेने खेळला जातो. गोव्यातील धनगर लोक विशिष्ट स्वरुपाने हा खेळ खेळतात.

धनगरी पुरुषांकडून सादर केले जाणारे गजी नृत्य हे केवळ जत्रा-यात्रामध्येच सादर करतात असे नाही, तर तो प्रसंगी एखाद्या छोटेखानी मंदिरासमोर अथवा उघड्यावर असणाऱ्या दगड धोंड्याच्या देवासमोरसुद्धा वैयक्तिक वा सामूहिक रित्या गजीनृत्य सादर केले जाते. हे नृत्य सादर करताना या समूहातील (पन्नास ते साठ गजीनृत्य करणारा समूह) म्होरक्या जसा नाचतो, तो जसा हावभाव करतो अथवा ज्याप्रकारे मागे पुढे अथवा गोल रिंगणात फिरतो, त्याच्या हावभावानुसारच इतर गजीनृत्य करणारी मंडळी देखील त्याच पद्धतीने हे नृत्य सादर करतात. गजीनृत्य करणारे हे धनगरी पुरुष अशा प्रकारचा साज शृंगार चढवून नृत्य करताना आढळून येतात.

चपई नृत्य ही कोकणातल्या धनगरांची लोकनृत्य कला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील धनगरी समाज सणावारास या नृत्यात रंगून जातो. हे नृत्य केवळ पुरुष मंडळीच सादर करतात. 'आरं आर' म्हणजे केवळ तुझीच भक्ती मला प्रिय अशी आर्त हाक देत धनगर बांधव देवाच्या नृत्यात रंगून जातात. पांढरं धोतर, पांढऱ्या रंगाचा झगा, त्यावर लाल रंगाचा कापडी पट्टा आढळतो. पायात खुळखुळा असल्यानं नृत्य सादर करताना एक वेगळाच नाद निर्माण होतो.

याच बरोबर लेझीम हा खेळ धनगर लोक अनेक वेळा सण उत्सवाच्या वेळी, लग्न समारंभाच्या वरातीत यात्रा व जत्रेच्या वेळी करतात, तसेच फुगडी धनगरी स्त्रियांच्या अतिशय आवडीचा नृत्य प्रकार होय, सण समारंभ, जत्रा व यात्रा या काळात स्त्रीया फुगडी सादर करतात, या व्यतरिक्त मलखांब खेळणे, लाठीकाठी खेळणे, दांडपट्टा व तलवार बाजी, सूर पारंब्या, विटी दांडू खेळणे हे खेळ सुध्दा धनगर लोक मेंढी चारत असताना खेळत असतात.

**धनगर समाजातील राजकीय स्थिती:**

१९६२ ते २०१४ या कालावधीत निवडणुकांचा अभ्यास केला असता असे दिसून येते की पाच आमदारांपेक्षा जास्त कधीच संख्या पुढे गेलेली नाही तर विधान परिषदेत या समाजातील काहीच लोक निवडून दिलेत त्यामध्ये अण्णासाहेब डांगे, माधवराव भिकाजी, धायगुडे विजय, हनुमंतराव मोरे, प्रकाश शिवाजीराव शेंडगे, रमेश शिवाजीराव शेंडगे, ना. धो. महानोर, अनंत कुमार, फिमनराव पाटील, रामराव वडकुते, रामहरी गोविंद रुपनवर व महादेव जानकर हे विधान परिषदेवर निवडून गेले यापैकी बोटावर मोजणे इतकेच लोक

मंत्रीपदावर आढळून आले अनंतराव देवकते, शिवाजी बापू शेंडगे, गणपतराव देशमुख, अण्णासाहेब डांगे यांनी काही काळ मंत्रिपदे भूषवीले आहेत. तर सध्या प्राध्यापक राम शिंदे व महादेव जानकर हे महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात आहेत. भारतीय संसदेचा इतिहास पाहिला तर महाराष्ट्रात आजपर्यंत फक्त एकमेव लोकसभेत गेलेला उमेद्वार म्हणजे रखमाजी गावडे, तोही १९५८ मध्ये बीड लोकसभा मतदारसंघातून तर महाराष्ट्रातून डॉ. विकास महात्मे हे राज्यसभेवर खासदार म्हणून निवडून आले होते. लोकसंख्येचा विचार केला तर धनगर समाजाचे विधान सभेतील प्रति-निधित्व अत्यल्प असल्याचे दिसून येते.

**धनगर समाजातील प्रसिध्द राजकीय व्यक्तिमत्त्व :**

१. प्रा. राम शिंदे, सभापती-महाराष्ट्र वि.प.
२. गणपतराव देशमुख, १० वेळा आमदार
३. अण्णा डांगे, माजी मंत्री
४. महादेव जानकर, पक्षाध्यक्ष- रासप
५. दत्तात्रय भरणे, कैबिनेट मंत्री
६. गोपीचंद पडळकर, वि.स.स.
७. विकास महात्मे, माजी खासद
८. रविकांत तुपकर, शेतकरी नेते

**समारोप:**

धनगर समाजाचा विस्तार पाहिला तर धनगर समाज जगाच्या पाठीवर सर्वत्र विखुरलेला दिसतो. शेळया, मेंढ्या, ढोरे पाळणारी, मेंढ पालन करणारी जमात सर्वत्र दिसून येते. भारतातही कन्याकुमारी ते कश्मीर पर्यंत जमात सर्वत्र आढळून येते. प्रदेश, प्रांत व भाषा परत्वे धनगर जमातीस वेगवेगळ्या नावाने ओळखले जात असले तरी त्यांचे सामाजिक, व्यावसायिक, सांस्कृतिक गुणवैशिष्ट्ये एकच असल्याचे दिसून येते. रानावनात निसर्गाशी ब्रह्ममान होणारा डोंगर, दऱ्या-खोऱ्यात धाडसाने राहणारा शूर पण नम्रपणे वागणारा हा समाज आढळून येतो. धनगर समाजाची राजकीय स्थिती किंवा राजकीय नेतृत्व निर्माण करण्यात आजच्या आधुनिकीकरणाच्या युगात देखील पाहिजे त्या प्रमाणात सत्तेचा वाटा त्यांना मिळत नाही.

**संदर्भ:**

१. दणाणे सतेज,(२०१३), "धनगर ; समाज आणि संस्कृती" अक्षय प्रकाशन, रत्नागिरी,पृ.क्र.१३

२. गवते ज्ञानेश्वर,(२०११),धनगरांच्या लोकसाहित्वतील समाजदर्शन,कैलास पब्लिकेशन,औरंगाबाद, पृ. क्र २९१,२९२.

३. भुजाडे होमेश,(२००८),धनगर समाज दशा आणि दिशा", प्रकाशक विलास पुनसे, वर्धा.

४. चव्हाण रामनाथ २०१८ भटक्या विमुक्ताची जात पंचायत खंड चार पुणे देशमुख ऑड कंपनी पब्लिकेशन.

५. भोले डॉक्टर भास्कर २०११ भारताचे शासन आणि राजकारण नागपूर पिंपळापुरे ऑड पब्लिकेशन.

६. दळणकर शिवाजी परभणी जिल्ह्यातील धनगर समाजाच्या आर्थिक व सामाजिक अध्याय.